# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी.

## पर्यावरण विभाग

जुना एस.टी. स्टँड,कापआळी,भिवंडी - 421302,जि. ठाणे.

ईमेल आयडी: envbnemc@gmail.com


---

## जाहिर आवाहन

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील सर्व फटाके विक्री करणारे व्यवसायिक व फटाके वापर करणारे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, **भारत सरकार,अधिसुचना क्रमांक G.S.R. 682 (E), dt. 5/10/1999, अन्वये १२५ dB (AI)** पेक्षा जास्त आवाज निर्माण करणा-या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करण्यास मनाई केली आहे.

अशा फटाक्यांचे उत्पादन, विक्री किंवा वापर बेकायदेशिर आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाक्यांमध्ये बेरियम सॉल्ट, लिथीयम अर्सेनिक, लीड, मर्क्युरी यासारखे घटक असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे. या घटकामुळे विषारी वायु तयार होतात हे वायू प्राणी व वनस्पती या दोघांना घातक आहेत. तसेच जनहित याचिका क्र. १५२/२०१५ मध्ये मा. ना. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाका विक्रेत्यांनी विस्फोटक व अधिनियम १८८४ आणि त्या अंतर्गत केलेले विस्फोटक नियम २००८ मधील प्रतिबंध व नियम यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी फटाके विक्रेत्यांनी बंदी असलेले फटाके विक्री करणेची नाही. तसेच परवानगी असलेले फटाके **महानगरपालिकेने निश्चित केलेल्या ठिकाणी परवानगी घेऊनच विक्री करणे अनिवार्य आहे.**

महाराष्ट्र शासनाचे **"माझी वसुंधरा अभियान" ४.० आणि "स्वच्छ सर्वेक्षण" २०२४** अभियानांतर्गत फटाकेमुक्त, प्लास्टिकमुक्त, कचरामुक्त, प्रदुषणमुक्त व पर्यावरणपूरक ग्रीन फेस्टिवल सण - उत्सव साजरे करण्याचा प्रयत्न करु. सदर अभियानांतर्गत नागरीकांनी फटाक्यांचा वापर टाळा, प्लॅस्टिकचा वापर टाळुन कापडी किंवा कागदी पिशवीचा वापर करा, सण समारंभामध्ये टाकावु वस्तुचा व पुन्हा वापर करण्यायोग्य वस्तुंचा जास्तीत जास्त वापर करावा. पर्यावरणपूरक, प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करावी.

**तरी येणारी दिवाळी हरित व पर्यावरणपूरक दिवाळी म्हणुन साजरी करूया. तसेच ही दिवाळी आनंदी व सुरक्षित राहो, अशा सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !!!**

सही/-
(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.**